MHST200002772025

## वि.दि.दा.क्र.१२५/२०२५ मधील निशाणी क्र.३२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दावा मिळकतीची परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचा आदेश मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२) अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

३) वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा वादीने निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. त्यामध्ये वादीने नि.५ व ७ वर प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांचेविरुद्ध तुर्तातुर्त ताकीद अर्ज दिलेला आहे. प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांना समन्सची बजावणी होऊन देखील त्यांनी ताकीद अर्जावर म्हणणे दाखल केलेले नाही. प्रतिवादी यांनी एप्रील २०२५ मध्ये केलेल्या मोजणीच्या आधारे दावा मिळकतीचे नुकसान केल्यास अथवा वादीचे वहिवाटीस हरकत अडथळा केल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. तसेच प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांनी म्हणणे दाखल करुन नि.५ व ७ वर निर्णय होण्यास कालावधी लागणार आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांनी त्यांचे म्हणणे दाखल करेपावेतो दावा मिळकतीची परिस्थिती 'जैसे थे' ठेवावी. सबब, त्यांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज मंजुर करणेत यावा.

४) प्रतिवादी क्रं.३ यांचे असे कथन आहे की, सदर दाव्यात ते आजरोजी हजर होत आहेत व माहिती देऊन म्हणणे आणि कैफियत दाखल करण्यास अर्ज

दिलेला आहे. सदर दाव्यात वादीस कोणतीही तातडी दिसुन येत नाही. सबब, त्यांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा.

५) प्रतिवादी क्रं.५ यांनी असे कथन केले आहे की, दिनांक २५.०४.२०२५ रोजी मोजणी झालेली असुन महाबळेश्वर येथील न्यायालयात दावा प्रलंबीत आहे. तसेच दाव्यात इतर प्रतिवादी असल्याने त्यांचे म्हणणे येणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा.

६) दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, दि.२५.०४.२०२५ रोजी दावा मिळकतीत प्रतिवादी क्रं.२ तहसिलदार महाबळेश्वर यांनी वादीस कोणतीही नोटीस न देता व प्रतिवादी क्रं.३ मोजणीदार आणि प्रतिवादी क्रं.४ चे वतीने मोठा पोलीस फौजफाटा घेऊन दावा मिळकतीमध्ये अनाधिकाराने प्रवेश केला. तसेच त्यांनी दावा मिळकतीच्या पुर्व हद्दीवरील कंपाऊंडच्या आतमध्ये पोल रोवण्याचा प्रयत्न केला. परंतु तो प्रयत्न वादीच्या कुटूंबियांनी थांबवला. प्रतिवादी क्रं.२ ते ४ यांचे कृत्य हे बेकायदेशीर आहे. त्यांनी प्रतिवादी क्रं.५ च्या सांगण्यावरुन सदरचे कृत्य केलेले आहे. तसेच त्यांनी वादीला दमदाटी करुन तथाकथीत अतिक्रमीत भाग प्रतिवादी क्रं.५ च्या ताब्यात देणेविषयी सांगितले आहे. तसेच प्रतिवादी क्रं.४ यांनी तुम्ही सरकारी कामकाजात अडथळा आणत आहे म्हणुन आम्ही तुम्हाला कोणत्याही क्षणी अटक करु असे सांगितले आहे. त्यामुळे वादींना अशी भिती आहे की, प्रतिवादी बेकायदेशीररित्या दावा मिळकतीमध्ये घुसखोरी करुन नासधुस करतील व वादीचे शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करतील.

७) प्रस्तुत दाव्यामध्ये अदयापपावेतो प्रतिवादींनी कैफियत व म्हणणे दाखल केलेले नाही. प्रतिवादी क्रं.५ यांच्या विद्वान विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, प्रस्तुत दाव्यात दोष असल्याने परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचा आदेश देता

येणार नाही. तसेच तसा आदेश दिला गेल्यास प्रतिवादी क्रं.५ यांना कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करता येणार नाही. उलटपक्षी, वादीच्या विद्वान विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, प्रतिवादींनी कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन कुठलीही कारवाई केल्यास त्यांची हरकत नाही. परंतु, प्रतिवादी हे बेकायदेशीररित्या कारवाई करण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादीने महाबळेश्वर येथील न्यायालयात दावा दाखल केला होता. परंतु, सदरचा दावा त्यांनी विनाशर्त काढुन घेतलेला आहे.

८) प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दि.२२.०४.२०२५ रोजी प्रतिवादी क्रं.५ यांच्या मिळकतीची मोजणी झालेली आहे व हद्द कायम दि.२५.०४.२०२५ रोजी केलेली आहे. त्याबाबतचा मोजणी नकाशा प्रतिवादी क्रं.५ यांनी अभिलेखावर दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर मोजणी नकाशावरुन प्रतिवादी क्रं.५ या कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन पुढील कारवाई निश्चीतच करु शकतात. केवळ दिवाणी न्यायालयात वादीने दावा दाखल केल्यामुळे त्यांच्या कायदेशीर हक्कावर कोणतीही बाधा निर्माण होणार नाही असे मला प्रथमदर्शनी वाटते. त्यामुळे प्रतिवादी यांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद फेटाळण्यास पात्र आहे.

९) प्रस्तुत प्रकरणामध्ये परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचा आदेश पारीत न केल्यास दावा मिळकतीच्या स्वरुपात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही कारण दि.२५.०४.२०२५ रोजी तहसिलदार, मोजणी अधिकारी व पोलिस हे हद्द कायम करण्याकरीता दावा मिळकतीत उपस्थित होते. मोजणीप्रमाणे हद्द कायम करताना तहसिलदार, महाबळेश्वर यांनी उपस्थित राहणे प्रथमदर्शनी असे दर्शवते की, वादीची त्यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा होण्याची भिती रास्त आहे. त्यामुळे, वादीचे वतीने प्रथमदर्शनी केस असल्याचे दिसुन येते.

१०) प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांनी बेकायदेशीररित्या कोणतेही कृत्य करु नये असा आदेश दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार

नाही. त्यामुळे, मी या निष्कर्षास आलो आहे की, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे -

## आदेश

| | |
|---|---|
| (१) | अर्ज (नि.३२) मंजुर करण्यात येतो. |
| (२) | प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी पुढील तारखेपर्यंत दावा मिळकतीची परिस्थिती 'जैसे थे' ठेवावी. |
| (३) | प्रतिवादी क्रं.५ हया कायदेशीर मार्गांचा अवलंब करुन महसुल अधिकारी यांच्यासमोर योग्य ती कारवाई करु शकतात. तसेच प्रस्तुत आदेशाने महसुल अधिकारी यांच्यासमक्ष चालणाऱ्या प्रकरणामध्ये कोणतीही बाधा येणार नाही. |
| (४) | खर्चाबाबत आदेश नाही. |

स्थळ : वाई.
दिनांक : ०९.०५.२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
वाई.